# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०८/२०२४ (मंगळवार) सकाळ**

---

## अवैधरीत्या दारुची तस्करी करणाऱ्या आरोपीस अटक

दिनांक १२/०८/२०२४ रोजी पोस्टे पारशिवनी येथील स्टाफ यांना मुखबिरद्वारे विश्वसनिय खबर मिळाली की, शिवशंकर अण्णाजी बोंदरे, वय ५० वर्ष रा. दहेगाव जोशी तह. पारशिवनी हा आपले राहते घरी अवैधरीत्या विनापरवाना देशी विदेशी दारूची विक्री करीत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून स्टाफने आरोपीचे घराची दारूबाबत घरझडती घेतली असता घराचे हॉलमध्ये आरोपीचे ताब्यातून विदेशी दारू रॉयल स्टॅग च्या ७२ निपा किमती १८०/रू प्रमाणे किंमती १२९६०/—रू. ०२) विदेशी दारू इंम्परीयल ब्लु च्या ०९ निपा किमती १६०/ रू प्रमाणे किमती १४४०/—रू. ०३) विदेशी दारू ओ.सी.ब्लु च्या ०८ निपा किंमती १५०/—रू प्रमाणे किंमती १२००/—रू. ०४) देशी दारू भिंगरी संत्रा नं. ०१ च्या २३ निपा प्रत्येकी १८०एम.एल प्रमाणे प्रत्येकी किंमती ७०/—रू प्रमाणे किंमती १६१०/—रू ०५) देशी दारू भिंगरी संत्रा नं.०१ च्या ४९ च्या प्रत्येकी ९० एम. एल. प्रमाणे प्रत्येकी किंमती ३५/—रू प्रमाणे किंमती १७१५/रू असा एकुण १८९२५/— रू चा मुद्देमाल जप्त केला. आरोपीविरूद्ध कलम ६५(ई) म.दा.का. अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे पारशिवनी येथील ठाणेदार पोनि राजेशकुमार थोरात, पोउपनि शिवाजी भताने, पोलीस हवालदार मुदस्सर जमाल, पोलीस अंमलदार पृथ्वीराज चव्हान, राकेश बंधाटे यांच्या पथकाने केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर